# पुणे महानगरपालिका
## “ पुराबाबत सावधानतेचा इशारा ”

पुणे शहर परिसरातील सर्व नागरिकांना विशेषत: नदी व नाले यालगत राहणाऱ्या नागरिकांना कळविण्यात येते की, अतिवृष्टी झाल्यानंतर नाल्यांना व नदीला पूर येण्याची शक्यता असते.

त्याचप्रमाणे नदीच्या पुरामुळे नाल्यातील पाण्याला मागे पाण्याचा फुगवटा येण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत नागरिकांनी खालीलप्रमाणे दक्षता घेण्याची विनंती आहे.

१. नदी व नाल्यांलगत पूररेषेत असलेल्या घरे/झोपड्या नागरिकांनी स्वत:हून काढून घ्याव्यात.
२. नदीच्या,नाल्यांच्या पात्रातील पाण्याजवळ जाऊ नये. विशेषत: लहान मुलांबाबत दक्षता घ्यावी.
३. डोंगरातील वा खाणीतील कड्यानजीक असलेल्या घरे/झोपड्यांवर दरडी वा कडे कोसळण्याची शक्यता असते, अशा परिस्थितीत तेथे घरे/झोपडीचे बांधकाम करू नये.बांधकाम असल्यास घरे/झोपड्या त्वरीत काढून घ्याव्यात.
४. विजेच्या खांबापासून व तुटलेल्या इलेक्ट्रीक तारांपासून सुरक्षित अंतर राखावे.
५. आपत्कालीन परिस्थितीत पुणे महानगरपालिकेकडून बाधित भागातील नागरिकांची नजिकच्या मदतकेंद्रावर हलविण्याची व्यवस्था केली जाते. तरी अशा प्रसंगी बाधित भागातील नागरिकांनी सहकार्य करावे.
६. वरील कोणत्याही मुद्यांबाबत नागरीकांना मदत पाहिजे असल्यास पुरनियंत्रण कक्षास किंवा नजीकच्या क्षेत्रिय कार्यालयाकडे वा अग्निशामक दलाशी संपर्क साधावा.
७. नागरिकांनी रस्त्यावर पावसाचे पाणी साठल्यास सावधपणे चालावे. नागरिकांनी वाहने सावकाश चालवावी व पाण्याखाली ड्रेनेज चेंबरचे अंदाज घ्यावा. कारण पाण्याच्या प्रवाहामुळे किंवा अपघाताने झाकण उघडे असण्याची शक्यता असते.
८. नदी व नाल्यावरील पूल आणि नदीलगतच्या उंच इमारती अथवा भिंतीवर लाल रंगाने धोक्याची पातळी दर्शविलेली असते.
९. पुणे महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय व शासनाच्या विविध विभागानी दिलेल्या सूचना, आदेश इत्यादीचे काटेकोरपणे पालन करावे.
१०. पावसामुळे एखादी जुनी इमारत पाडावयास झाली असल्यास तात्काळ पुणे महानगरपालिका अगर अग्निशामक दलाशी संपर्क साधावा.

पुणे महानगरपालिका पुरनियंत्रण कक्ष ( महानगरपालिका भवन) दूरध्वनी क्रमांक :- २५५०१२६९
(१) पूरनियंत्रण व आपत्कालीन कक्ष : २५५०६८००/१/२/३/४ (२४ तास )
(२) अग्निशामक दल : १०१
(३) सुरक्षा रक्षक कक्ष : २५५०११३३

**पूरनियंत्रण/पावसाळा संबंधी काही तक्रार असल्यास नागरिकांनी आपल्या संबंधित खालील दिलेल्या क्षेत्रिय कार्यालयास संपर्क करावा.**

| अ.क्र | क्षेत्रिय कार्यालय | पूर नियंत्रण वॉर रूम संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| १ | नगर रोड/ वडगाव शेरी | ०२०-२५५०९००० |
| २ | येरवडा/कळस/धानोरी | ०२०- २५५०९१०० |
| ३ | ढोले पाटील रोड | ०२०-२५५०७३०० |
| ४ | औंध/बाणेर | ०२०-२५५०७१०० |
| ५ | शिवाजीनगर/घोले रोड | ०२०- २५५०१५५० |

| | | |
|---|---|---|
| ६ | कोथरुड/बावधन | ०२०- २५५०१६०० |
| ७ | धनकवडी/सहकारनगर | ०२०-२५५०८९००/२० |
| ८ | सिंहगड रोड | ०२०-२४६०६३०० |
| ९ | वारजे - कर्वेनगर | ०२०- २५५९७७०० |
| १० | हडपसर/मुंढवा | ०२०- २५५९७४४९ |
| ११ | वानवडी/रामटेकडी | ०२०- २५५०६२५०<br>०२०- २५५०६२९९ |
| १२ | कोंढवा /येवलेवाडी | ०२०- २५५०८८०० |
| १३ | कसबा/विश्रामबागवाडा | ०२०- २५५०७६००<br>०२०- २५५०७६२० |
| १४ | भवानी पेठ | ०२०-२५५९७२०० |
| १५ | बिबवेवाडी | ०२०- २५५०८७०० |

**(विक्रम कुमार)**
**महापालिका आयुक्त**
**पुणे महानगरपालिका**

**(मुरलीधर मोहोळ)**
**महापौर**
**पुणे महानगरपालिका**

**(माधव जगताप)**
**उप आयुक्त (आपत्ती व्यवस्थापन)**
**पुणे महानगरपालिका**

**टिप :- मास्क वापरा, वारंवार साबणाने हात धुवा, सॅनिटायझरचा वापर करा आणि गर्दीत जाण्याचे टाळा.**